जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ५९६ दिनांक - ०५/०८/२०२३**

युनिट -२ गुन्हे शाखा,पुणे शहर

## कारच्या काचेवर धमकीची चिट्ठी चिटकवुन व्यापा-यास खंडणी मागणा-या आरोपीस केले जेरबंद

कोरेगांव पार्क पोलीस स्टेशन पुणे शहर गु.र.नं.१२८/२०२३ भा.द.वि. कलम ३८७,५०७ अन्वये गुन्हा दाखल असुन, दाखल गुन्हयाचा युनिट-२ कडील पोलीस अधिकारी व पोलीस अमंलदार समांतर तपास करीत असतांना युनिट-२ कडील **पोलीस अमंलदार गजानन सोनुने व पुष्पेंद्र चव्हाण** यांनी काही एक धागेदोरे माहीत नसताना, तांत्रिक विश्लेषण द्वारे कौशल्यपुर्ण तपास करुन सदर गुन्हयातील अनोळखी मोबाईल फोन धारक इसमास निष्पन्न करुन तो उंबरे (वेळापुर) पोस्ट नेवरे, ता. माळशिरस, जिल्हा सोलापुर येथे असल्याची माहीती प्राप्त झाली.

त्या बाबत युनिट-२ प्रभारी अधिकारी श्री नंदकुमार बिडवई यांनी कायदेशीर कारवाई करण्याचे आदेशीत केले असता युनिट-२ कडील पोलीस अंमलदार गजानन सोनुने,पुष्पेंद्र चव्हाण व अमोल सरडे, यांचे सह खाजगी वाहनाने उंबरे (वेळापुर) ता.माळशिरस,जिल्हा सोलापुर येथे जावुन त्यास सापळा रचुन सदर गुन्हयातील आरोपी नामे **श्रीनाथ यल्लप्पा शेंडगे वय २५ वर्षे, धंदा-झोमॅटो कंपनीमध्ये नोकरी, रा.मु.उंबरे(वेळापुर)पो.नेवरे,ता.माळशिरस, जिल्हा सोलापुर** यास दिनांक ०४/०८/२०२३ रोजी ताब्यात घेतले. त्याचे ताब्यातुन गुन्हयात वापरलेला मोबाईल फोन व व्होडाफोन /आयडीया कंपनीचे सिमकार्ड असे ताब्यात घेवुन गुन्हे शाखा युनिट-२ पुणे शहर येथील कार्यालयामध्ये घेवुन आल्यानंतर त्यास पुन्हा विश्वासात घेवुन सखोल तपास केला असता, त्याने सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर श्री संदिप कर्णिक, मा.अप्पर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे, श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पो.आयुक्त गुन्हे, श्री सुनिल तांबे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. नंदकुमार बिडवई, गुन्हे शाखा, युनिट-२, पुणे शहर,म.सपोनि वैशाली भोसले, विशाल मोहिते,पोउपनि नितीन कांबळे, राजेंद्र पाटोळे, पोलीस अंमलदार गजानन सोनुने, पुष्पेंद्र चव्हाण, अमोल सरडे, उज्वल मोकाशी, संजय जाधव, उत्तम तारु, साधना ताम्हाणे, नामदेव रेणुसे, मोहसिन शेख, निखिल जाधव, विनोद चव्हाण व नागनाथ राख यांनी केलेली आहे.


महाराष्ट्र पोलीस